काळ (१ x १५ मे.वॅट) व कुंभे (१ x १० मे.वॅट) जलविद्युत प्रकल्प BOT तत्वावर पूर्ण करण्याकरिता BOT प्रस्ताव व संबंधित निविदा प्रक्रिया व कंत्राटाबाबत कार्यवाही करण्याकरिता कृतीगटाचे गठण

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्रमांक- जविप्र २०१७/प्र. क्र. २०१/जवि
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक : २१ फेब्रवारी २०१८

<u>प्रस्तावना</u> :

मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली व मा. मंत्री (जलसंपदा) आणि राज्यमंत्री (जलसंपदा) यांच्या प्रमुख उपस्थितीत दि. ०९.०६.२०१६ रोजी झालेल्या मा. मुख्यमंत्री फ्लॅगशिप कार्यक्रम आढावा बैठकीच्या इतिवृत्ता नुसार काळ (१ x १५ मे.वॅट) व कुंभे (१ x १० मे.वॅट) जलविद्युत प्रकल्पावर शासनामार्फत गुंतवणूक न करता प्रकल्प BOT पध्दतीने करता करण्याबाबत सुचना देण्यात आल्या. त्या अनुषंगाने चालु असलेल्या कार्यवाहीनुसार अपेक्षित उद्दिष्ट साध्य होण्यास विलंब होत असल्याचे निदर्शनास येत आहे. दि. २२.११.२०१७ रोजी झालेल्या साक्षीचेवेळी लोकलेखा समितीने सदर प्रकल्प पूर्णत्वाच्या कार्यवाहीबाबत ठोस निर्णय घेण्याबाबत सूचना केलेल्या असून, सदर जलविद्युत प्रकल्प BOT तत्वावर पूर्ण करण्याकरिता, BOT प्रस्ताव व संबंधित निविदा प्रक्रिया जलद गतीने पार पाडण्याकरिता एका कृतीगटाचे गठण करण्यासंबंधीची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:

१. काळ (१ x १५ मे.वॅट) व कुंभे (१ x १० मे.वॅट) जलविद्युत प्रकल्पाचे उर्वरित कामे BOT तत्वावर पूर्ण करण्याकरिता BOT प्रस्ताव, निविदा प्रक्रिया व चालु कंत्राटांबाबत ठोस कार्यवाही करण्याकरिता महासंचालक, संकल्पचित्र, प्रशिक्षण, जलविज्ञान, संशोधन व धरण सुरक्षा, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे **कृतीगट (काळ व कुंभे जलविद्युत प्रकल्प)** गठीत करण्यात येत आहे.

१	महासंचालक, संकल्पचित्र, प्रशिक्षण, जलविज्ञान, संशोधन व धरण सुरक्षा, नाशिक		अध्यक्ष
२	मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, कोकण प्रदेश, मुंबई	:	सदस्य
३	मुख्य अभियंता (विद्युत), जलविद्युत प्रकल्प, मुंबई	:	सदस्य
४	मुख्य अभियंता (स्थापत्य), जलविद्युत प्रकल्प व गुणनियंत्रण, पुणे	:	विशेष निमंत्रित
५	अधीक्षक अभियंता, कोयना संकल्पचित्र मंडळ, पुणे	:	सदस्य
६	अधीक्षक अभियंता, ठाणे पाटबंधारे मंडळ, ठाणे	:	सदस्य सचिव

२. सदर **कृतीगटाची कार्यकक्षा** खालील प्रमाणे राहील :-

१) काळ व कुंभे जलविद्युत प्रकल्पाचे सद्य:स्थितीत झालेल्या कामाच्या अनुषंगाने उर्वरित कामे पूर्ण करण्याकरिता सदर प्रकल्प विकसित करताना संभाव्य पर्यायाचा अभ्यास करून त्याची व्याप्ती ठरवावी.

२) खाजगी प्रर्वतक/ कंत्राटदाराने करावयाच्या कामाचा Scope ठरविणे तसेच स्थापत्य व विवयां घटकांच्या देखभाल व दुरुस्तीबाबत अटी व शर्ती ठरविणे.

३) प्रचलित BOT Model नुसार निविदा पध्दत/ प्रक्रिया ठरवणे, निविदासंबधीत दस्तावेज तयार करणे.

४) सदर BOT प्रस्तावाकरिता Threshold व Upfront Premium संबंधित बाबी ठरविणे.

५) BOT प्रस्ताव सादर करणे व निविदा प्रक्रिया राबविण्याबाबतची कार्यवाही कालबध्द पध्दतीने यशस्वी करण्यासंबंधीचे ठोस नियोजन करणे.

३. कृतीगटाने उपरोक्त कार्यवाही ३ महिन्यामध्ये पूर्ण करावी.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेताक क्र. २०१८०२२११७२२०२६२२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dnyandeo Ananda Bagade

Digitally signed by Dnyandeo Ananda Bagade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c6c9c3f117cf64b38033df6ee6108697532342ef3db994d443607916435f8516, serialNumber=857832272f9c6e57a4d72f8a22cf41cccb1c816e7374da487ed5ee3e377def65, cn=Dnyandeo Ananda Bagade
Date: 2018.02.21 17:22:34 +05'30'

(ज्ञा. आ. बागडे)
शासनाचे उप सचिव

प्रत :

१) मा. विरोधी पक्ष नेते, विधान सभा, विधान भवन, मुंबई.
२) मा. विरोधी पक्ष नेते, विधान परिषद, विधान भवन, मुंबई.
३) मा. मंत्री, जलसंपदा यांचे खाजगी सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) मा. राज्यमंत्री (जलसंपदा) यांचे खाजगी सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) प्रधान सचिव (जलसंपदा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) सचिव (जसंव्य व लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) सचिव (प्र.स.), जलविद्युत, मंत्रालय, मुंबई.
८) महासंचालक, संकल्पचित्र, प्रशिक्षण, जलविज्ञान, संशोधन व धरण सुरक्षा, नाशिक
९) मुख्य अभियंता (स्थापत्य), जलविद्युत प्रकल्प व गुणनियंत्रण, पुणे.
१०) मुख्य अभियंता (विद्युत), जलविद्युत प्रकल्प, मुंबई.